भारतीय गैर न्यायिक
भारत INDIA
रु. 500 FIVE HUNDRED RUPEES
पाँच सौ रुपये Rs. 500
सत्यमेव जयते
INDIA NON JUDICIAL

महाराष्ट्र MAHARASHTRA ◑ 2018 ◑ AK 666250

# // करारनामा //

## पे ॲन्ड पार्क अधिकार देणेकरीताचा करारनामा

हा करारनामा मुक्काम भाईदर,जिल्हा-ठाणे, महाराष्ट्र राज्य येथे आज दिनांक २६ माहे नोव्हेंबर सन २०१८ रोजी करण्यात आला.

उप-आयुक्त
मिरा-भाईदर महानगरपालिका
भाईदर (पश्चिम)

प्रथम पक्षिय
(हयापुढे सोईचे दृष्टीने
"महानगरपालिका" असा उल्लेख
केला आहे.)

आणि

मे.श्रुती इंटरपायजेस,
ए-१०३, मथुरा निकेतन,
कस्तुरी गार्डन जवळ,
टेंबा हॉस्पिटल, भाईदर (प.)

द्वितीय पक्षिय
(हयापुढे सोईचे दृष्टीने
"एजंट / ठेकेदार" असा उल्लेख
केला आहे.)

यांच्यामध्ये होत आहे.

TREASURY OFFICE
जिल्हा कोषागार कार्यालय, ठाणे
24 OCT 2018
मुद्रांक प्रमुख लिपीक / लिपीक

मिरा भाईदर महानगरपालिका

For SHRUTI ENTERPRISES
Proprietor

भारतीय गैर न्यायिक

भारत INDIA

रु. 500 FIVE HUNDRED RUPEES

पाँच सौ रुपये Rs. 500

सत्यमेव जयते

INDIA NON JUDICIAL

महाराष्ट्र MAHARASHTRA ◑ 2018 ◑ AK 666251

जिल्हा कोषागर कार्यालय, ठाणे
24 OCT 2018
मुद्रांक प्रमुख लिपीक / लिपीक

ज्याअर्थी मिरा-भाईदर महानगरपालिका ही नागरी संस्था महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या तरतुदीनुसार स्थापन झाली आहे आणि त्यांचे मुख्य कार्यालय स्व. इंदिरा गांधी भवन, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईदर (प.) ४०१ १०१ येथे आहे.

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम २४३ (अ) अन्वये महानगरपालिका क्षेत्रातील वाहतुक पोलिस व आर.टी.ओ. इत्यादींशी विचारविनियम करुन मिरा भाईदर शहरासाठी सार्वजनिक जागेवर "पैसे भरा आणि वाहने उभे करा" (पे ॲन्ड पार्क) या तत्वावर वाहने उभी करुन ठेवण्याच्या किंवा थांबविण्याच्या जागा/ ठिकाणे प्रस्तावित केली आहे आणि त्यासाठी वाहन चालक/मालकांकडून वाहने, नमुद वेळेत, नमुद ठिकाणी उभी करण्यासाठी आकारावयाचे शुल्क (पार्कींग चार्जेस) वसुल करण्यासाठी मा. महासभा दि.०८/१२/२०१७ ठराव क्र.३४ अन्वये दर मंजुर करण्यात आले आहेत.

For SHRUTI ENTERPRISES

Proprietor

भारतीय गैर न्यायिक

भारत INDIA

रु. 500 FIVE HUNDRED RUPEES

पाँच सौ रुपये Rs. 500

सत्यमेव जयते

INDIA NON JUDICIAL

महाराष्ट्र MAHARASHTRA ◑ 2018 ◑ AK 666254

TREASURY OFFICE

जिल्हा कोषागार कार्यालय, ठाणे
24 OCT 2018
मुख्य अनुज्ञ लिपीक / लिपीक

ज्याअर्थी, महानगरपालिकेने (अ) मिरारोड स्टेशनजवळ मिरारोड(पू) या जागेतील आरक्षण क्र.१८४ क्षेत्र २९४० चौ.मी. व (ब) मिरारोड रेल्वे स्टेशन समांतर रस्त्यावर स्काय वॉक खाली (सब स्टेशन व स्काय वॉक लॅंडींगजवळ) येथील वाहनतळ या जागी परिशिष्ट 'डी' मधील नमुद पार्कींग क्षमतेसाठी खाजगी संस्थेमार्फत <u>एक वर्षाच्या कालावधीसाठी</u> पे ॲन्ड पार्क योजना राबविणेकरीता आणि वाहन चालक/मालकांकडून पार्कीग चार्जेस वसूल करणे या प्रस्तावासाठी दि.१२/०५/२०१८ रोजीच्या "लोकमत व मिड डे" या वृत्तपत्रातून निविदा मागविलेल्या होत्या.

मिरा भाईंदर महानगरपालिका
कर अधिकारी
भाईंदर (प.)

आणि ज्याअर्थी ठेकेदार हयांनी "पैसे भरा आणि वाहने उभी करा" (पे ॲन्ड पार्क) योजना नूसार, निविदा फॉर्म व पुस्तिकेमध्ये विस्तृतपणे वर्णन केलेल्या जागेत वाहनतळ चालविणेसाठी महापालिकेस प्रस्ताव प्रस्तुत केला आहे.

For SHRUTI ENTERPRISES

Proprietor

भारतीय गैर न्यायिक
भारत INDIA
रु. 500
FIVE HUNDRED RUPEES
पाँच सौ रुपये
Rs. 500
सत्यमेव जयते
INDIA NON JUDICIAL

महाराष्ट्र MAHARASHTRA ◑ 2018 ◑ AK 66625

TREASURY OFFICE
जिल्हा कोषागर कार्यालय, पुणे
24 OCT 2018
मुद्रांक प्रमुख लिपीक / लिपीक

आणि ज्याअर्थी एजंट/ठेकेदार यांनी निविदा फॉर्म व पुस्तिकेमध्ये विस्तृत वर्णन केलेल्या वाहन तळाच्या जागेत "पैसे भरा आणि वाहने उभी करा" या तत्वावर ठेका चालविणेत असलेला रस व तीव्र इच्छा पाहून महापालिकेने ठेकेदार यांचा प्रस्ताव स्विकारला आहे.

आणि ज्याअर्थी प्रस्ताव दस्तऐवजांमध्ये नमुद केलेल्या अटी, शर्ती, निर्देश आणि सुचनांचे योग्य रितीने पालन करण्याची सर्व जबाबदारी एजंट/ठेकेदार हयांची आहे.

त्याअर्थी सदरचा करारनामा साक्षीदारांच्या समक्ष करण्यात येत असून उभयपक्षांमधील मान्य व कबुल करण्यात येत आहे. ते खालीलप्रमाणे :-

For SHRUTI ENTERPRISES
Proprietor

भारतीय गैर न्यायिक
भारत INDIA
रु. 500 FIVE HUNDRED RUPEES
पाँच सौ रुपये Rs. 500
सत्यमेव जयते
INDIA NON JUDICIAL
महाराष्ट्र MAHARASHTRA ◑ 2018 ◑ AK 666253

TREASURY OFFICE
जिल्हा कोषागर कार्यालय, ठाणे
24 OCT 2018
मुद्रांक प्रमुख लिपीक / लिपीक
मिरा भाईंदर महानगरपालिका कर कार्यालय

## अटी व शर्ती

**A)** कराराची व्याप्ती: -

१) महानगरपालिकेने वेळोवेळी काढलेल्या सुचनापत्रानुसार लागू केलेल्या दरांप्रमाणे नमुद वाहनांकडून "पैसे भरा आणि वाहने उभी करा" शुल्क वसुल करण्यास एजंट /ठेकेदार यांना कायदेशिर अधिकार देण्यात येत आहेत. महानगरपालिकेने मंजुर केलेल्य दरापेक्षा जास्त दराने शुल्क वसुल केल्याचे निदर्शनास आल्यास करारनामा रद्द करणेत येईल. तसेच महानगरपालिका यांच्याकडे ठेकेदार यांनी जमा केलेली सुरक्षा अनामत रक्कम जप्त करण्यात येऊन ठेकेदार यांना काळ्या यादीत टाकण्यात येईल.

For SHRUTI ENTERPRISES
Proprietor

भारतीय गैर न्यायिक
भारत INDIA
रु. 500
FIVE HUNDRED RUPEES
पाँच सौ रुपये
Rs. 500
सत्यमेव जयते
INDIA NON JUDICIAL

महाराष्ट्र MAHARASHTRA ◑ 2018 ◑ AK 666255

TREASURY OFFICE
जिल्हा कोषागार कार्यालय, ठाणे
24 OCT 2018
मुख्य लिपीक / लिपीक

२) मिरा भाईदर महानगरपालिका क्षेत्रातील निविदे पुस्तिकेमध्ये दर्शविलेल्या जागेवरती पे ॲन्ड पार्क चालविण्याकरीता चा कालावधी एक वर्षाचा राहील. आयुक्त यांना सदरचा करारनामा रद्द करणे, वाढीव मुदत देणे, नुतनीकरण करुन देणेकरीताचे अधिकार राखून ठेवले आहेत. सदर ठेकेदार यांनी १ वर्षामध्ये भरणा करावयाचा महसूल रक्कम वेळोवेळी भरल्यास व अटीशर्तीचा कोणताही भंग न केल्यास व त्यांचे काम महापालिकेस समाधानकारक वाटल्यास किंवा काही कारणास्तव आवश्यकता वाटल्यास आयुक्त यांस सदर कराराच्या कालावधीची मुदत वाढविण्यास अधिकार राहतील. परंतु मुदतवाढीस मंजुरी देण्याकरीता महापालिका आयुक्तास बंधनकारक राहणार नाही.

For SHRUTI ENTERPRISES
Proprietor

भारतीय गैर न्यायिक

भारत INDIA

रु. 500 FIVE HUNDRED RUPEES

पाँच सौ रुपये Rs. 500

सत्यमेव जयते

INDIA NON JUDICIAL

महाराष्ट्र MAHARASHTRA ◑ 2018 ◑ AK 666256

जिल्हा कोषागार कार्यालय, ठाणे 24 OCT 2018 मुख्य लिपीक / लिपीक

३) हा करारनामा निविदा दस्तावेजात नमुद केल्याप्रमाणे ठराविक / विनिर्दिष्ट ठिकाणी दर्शविलेल्या वाहनतळाच्या जागेत (पे ॲन्ड पार्क) योजना चालविण्यासाठीचे अधिकार प्रदान करण्यासाठी आहे.

४) विनिर्दिष्ट केलेल्या जागा व्यतिरिक्त कोणताही अतिरिक्त जागा किंवा ठिकाणांचा वापर केल्यास, अशावेळी सदर ठेकेदार यांनी या निविदेच्या नियमांचे उल्लघंन केले आहे असे मानून प्रथम पक्षीय यांनी निर्देशित केलेली कारवाई ठेकेदार करील, जी अंतिम कारवाई असेल.

५) कराराचा कालावधी आणि सुरुवात :-

एजंट/ठेकेदार यांनी (पे ॲन्ड पार्क) योजना चालविण्यासाठीचा कराराचा कालावधी १ वर्षे असेल. (अट क्र.१.१ नुसार पालन करुन व वेळोवेळी मनपाची येणारी महसूल रक्कम भरल्यास.)

For SHRUTI ENTERPRISES

Proprietor

भारतीय गैर न्यायिक

भारत INDIA

रु. 500 FIVE HUNDRED RUPEES

पाँच सौ रुपये Rs. 500

सत्यमेव जयते

INDIA NON JUDICIAL

महाराष्ट्र MAHARASHTRA ◑ 2018 ◑ AK 666257

करार समाप्त झाल्यावर महापालिकेने कालावधीत वाढ केल्यास सदर कंत्राट (मुदतवाढ) हे वाढविलेल्या काळासाठी महसूल रक्कमेच्या १० टक्के अधिक देतील. आणि ठेकेदार हे त्याकरीता कबूल नसल्यास तो सदर कराराचा कालावधी संपण्यापुर्वी ३ महिने अगोदर नोटिस देईल.

६) एजंट / ठेकेदार मान्य करतात की, सदर कराराच्या तारखेपासून ३ (तीन) दिवसांच्या आत वाहनतळाची जागा "पे ॲन्ड पार्क योजना" चालविणेसाठी ताब्यात घेतील आणि त्याप्रमाणे महापालिकेस लेखी कळवितील आणि तसे न केल्यास कोणतीही सुचना न देता E.M.D. व सुरक्षा ठेव (Security Deposit) जप्त करण्याचे हक्क महानगरपालिकेला आहेत.

७) सदर कराराचा १ वर्षाचा कालावधी ठेकेदार यांना दिलेल्या कार्यादेशात नमुद केल्याप्रमाणे असेल.

For SHRUTI ENTERPRISES

Proprietor

भारतीय गैर न्यायिक

भारत INDIA

रु. 500 FIVE HUNDRED RUPEES

पाँच सौ रुपये Rs. 500

सत्यमेव जयते

INDIA NON JUDICIAL

महाराष्ट्र MAHARASHTRA ◑ 2018 ◑ AK 666258

८) एजंट / ठेकेदार मान्य करतात की, कोणत्याही परिस्थितीत उपरोक्त वाहने उभी करण्याचे दर वाढविले जाणार नाहीत. एजंट / ठेकेदार मान्य करतात की, वाहनतळाची जागा २४ तास वाहने उभी करण्याकरीता खुली ठेवण्यात येईल.

९) एजंट/ठेकेदार मान्य करतो की, कोणत्याही व्यक्तीस प्राधान्य न देता कटाक्षाने प्रथम येणा-यास प्रथम सेवा तत्वावर गाडी उभी करण्यास परवानगी आहे. कोणत्याही कंपनीच्या, कोणाही विशिष्ट व्यक्ती/व्यक्तींना मासिक परवाना पध्दती व्यतिरिक्त गाडया ठेवण्यास (उभ्या करण्यास) वाहनतळाची कोणतीही जागा/ठिकाणाचे आरक्षण देणार नाही. असे एजंट / ठेकेदार मान्य करतात. तसेच मनपाची वाहने किंवा सरकारी वाहने पे ॲन्ड पार्क मध्ये उभी केल्यास त्याबाबतचा कोणताही शुल्क ठेकेदार घेणार नाही.

For SHRUTI ENTERPRISES

Proprietor

भारतीय गैर न्यायिक

भारत INDIA

रु. 500 FIVE HUNDRED RUPEES

पाँच सौ रुपये Rs. 500

सत्यमेव जयते

INDIA NON JUDICIAL

महाराष्ट्र MAHARASHTRA ◑ 2018 ◑ AK 666259

१०) एजंट/ठेकेदार मान्य करतो की, निविदा पुस्तिकेत दर्शविलेल्या पे ॲन्ड पार्क दरसुची प्रमाणे पैसे वसूल करील.

११) एजंट/ठेकेदार मान्य व कबुल करतात की, महापालिकेच्या मंजुरी शिवाय याठिकाणी दिलेल्या करारातील फायदे आणि विशेष हक्क किंवा त्यातील काही भाग व त्यातील कोणतेही हित संबंध इतर कोणत्याही व्यक्तीस किंवा व्यक्तींना एजंट/ठेकेदार हस्तांतरण किंवा पोट भाडयाने देणार नाहीत.

**B) (पे ॲन्ड पार्क) योजना चालविण्यासाठी लागणारी साधणे :**

१) सदरचे वाहनतळाचे जागेबद्दल महानगरपालिकेने मंजुर केलेले दराप्रमाणे वाहने उभे करण्याचे शुल्क दर्शविणारे फलक प्रदर्शित करणे व त्याची देखभाल करणे एजंट/ठेकेदार हयांना मान्य व कबुल आहे. तसे न केल्याचे निदर्शनास आल्यापासून पुर्तता

For SHRUTI ENTERPRISES

Proprietor

भारतीय गैर न्यायिक
भारत INDIA
रु. 500
FIVE HUNDRED RUPEES
पाँच सौ रुपये
Rs. 500
सत्यमेव जयते
INDIA NON JUDICIAL

महाराष्ट्र MAHARASHTRA ◑ 2018 ◑ AK 666260

होईपर्यंत दर दिवशी रु. १००/- याप्रमाणे दंड आकारण्यात येईल.

२) एजंट/ठेकेदार मान्य करतात की, कराराच्या तारखेपासून ७ (सात) दिवसांच्या आत (जागेचा ताबा घेण्याचे ३ दिवस वगळून) पे ॲन्ड पार्क योजना चालविण्यासाठी लागणारी सर्व साधने वाहनतळाच्या जागेत बसवून वाहनतळाची जागा पुर्णपणे विकसित झाल्यानंतर व कार्यादेश प्राप्त झाल्यानंतरच सदरच्या जागेत वाहन उभे करण्यास खुले करतील आणि तसे न केल्यास कोणतीही सुचना न देता E.M.D. तसेच सुरक्षा ठेव (Security Deposit) जप्त करण्याचे हक्क महानगरपालिकेला आहेत.

३) अशा प्रकारचे वाहनतळाचे विकसित करण्याचे काम करीत असताना महापालिकेच्या मालमत्तेस काही नुकसान झाल्यास, एजंट/ठेकेदार हे महापालिकेच्या समाधानार्थ त्याची पुनःस्थापना करतील. सदर पुनःस्थापना किंवा दुरुस्ती करीताचे होणारे सर्व

जिल्हाधिकोषागार कार्यालय, ठाणे
24 OCT 2018
मुख्य लिपीक / लिपीक

For SHRUTI ENTERPRISES
Proprietor

भारतीय गैर न्यायिक

भारत INDIA

रु. 500 FIVE HUNDRED RUPEES

पाँच सौ रुपये Rs. 500

सत्यमेव जयते

INDIA NON JUDICIAL

महाराष्ट्र MAHARASHTRA ◑ 2018 ◑ AK 666261

खर्च सदर एजंट/ठेकेदार हेच करतील. महापालिका ही सदर दुरुस्ती/पुन:स्थापने करीता कोणतीही रक्कम सदर एजंट/ठेकेदार यांना देणार नाही.

४) वाहनतळाच्या जागेवरील फर्निचर म्हणजेच पार्कींग-नो पार्कींग चे फलक, वाहनतळाच्या जवळील रस्त्यावरील मार्गदर्शक खुणा, चालू अवस्थेत असलेली सी.सी.टीव्ही., घडयाळे, चौकी (Stall) आणि पे ॲन्ड पार्क योजना योग्यरितीने कार्यान्वित (सुरु) व्हावी म्हणून दक्षता घेण्यासाठी व इतर आवश्यक सर्व गोष्टी करण्याची जबाबदारी ठेकेदाराची राहील.

५) "ही मिरा भाईंदर महानगरपालिकेची वाहनतळाची जागा आहे" असे दर्शविणारी इंग्रजी व मराठी मध्ये आवश्यक असणारे फलक वाहनतळाचे जागेच्या दर्शनीय भागात प्रदर्शित करणे व याची देखभाल करणे हे एजंट / ठेकेदार हयांना मान्य व कबुल आहे.

जिल्हा कोषागर कार्यालय, ठाणे
24 OCT 2018
मुख्य लिपीक / लिपीक

For SHRUTI ENTERPRISES
Proprietor

भारतीय गैर न्यायिक
भारत INDIA
रु. 500
FIVE HUNDRED RUPEES
पाँच सौ रुपये
Rs. 500
INDIA NON JUDICIAL

महाराष्ट्र MAHARASHTRA
2018
AK 666262

जिल्हा कोषागार कार्यालय, ठाणे
24 OCT 2018
लिपीक

६) "उभी करण्यात आलेले वाहने ही वाहन मालकाच्या स्वतःच्या जोखमीवर उभी करण्यात आलेली असून कोणत्याही कारणांने वाहनतळावरील जागेत उभी केलेल्या वाहनांस कोणत्याही कारणाने कोणतेही नुकसान, हानी किंवा चोरी झाल्यास त्यास

महानगरपालिका किंवा एजंट / ठेकेदार जबाबदार राहणार नाही. असे दर्शविणारे फलक प्रदर्शित करणे व लावणे व त्याची देखभाल करणे एजंट/ ठेकेदार हयांना मान्य व कबुल आहे.

## C) देखभाल व दुरुस्ती :

१) पे ॲन्ड पार्क योजना सुरु होण्यापुर्वी महापालिका वाहने उभी करण्याची पावती पुस्तिका ठेकेदार यांनी स्वतः छापून घ्यावयाची आहे. परंतु सदरची पुस्तिकेचा मसुदा महापालिकेकडून अंतीम करुन घेणे ठेकेदार यांच्यावर बंधनकारक राहिल. सदरची वाहने उभी करण्याचे तिकिटांमध्ये

For SHRUTI ENTERPRISES
Proprietor

भारतीय गैर न्यायिक

भारत INDIA

रु. 500 FIVE HUNDRED RUPEES

पाँच सौ रुपये Rs. 500

सत्यमेव जयते

INDIA NON JUDICIAL

महाराष्ट्र MAHARASHTRA 2018 AK 666263

जिल्हा कोषागार कार्यालय, ठाणे
24 OCT 2018
प्रमुख मुद्रांक लिपीक / लिपीक

अनुक्रमाकासोबत स्थळप्रत, पे ॲन्ड पार्क योजनेचे ठिकाण दर्शविणे, महापालिका व प्राधिकृत एजंट/ठेकेदाराचे नाव, वाहन क्रमांक, आत येण्याची व बाहेर जाण्याची वेळ, वाहने उभे करण्याचे मंजुर दराची यादी, जी.एस.टी. ची रक्कम आणि "वाहने वाहन मालकीचे जोखमीवर उभी करणे" असे दर्शविणारी सुचना इत्यादींचा सदर पावती पुस्तिकेमध्ये असेल. सदर पावती पुस्तिका छापण्यासाठी येणारा खर्च ठेकेदार यांनी करावयाचा आहे.

२) वाहनतळाची जागा वाहने उभी किंवा पार्कीगसाठीच वापरण्यात यावी. त्याव्यतिरिक्त इतर कोणत्याही गोष्टीसाठी जागेचा वापर करणार नाहीत असे एजंट /ठेकेदार मान्य करतात. तसेच सदरची जागा स्वच्छ, व्यवस्थित व चांगल्या स्थितीत ठेवण्याची जबाबदारी ठेकेदार यांची राहील.

For SHRUTI ENTERPRISES
Proprietor

भारतीय गैर न्यायिक

भारत INDIA

रु. 500 FIVE HUNDRED RUPEES

पाँच सौ रुपये Rs. 500

सत्यमेव जयते

INDIA NON JUDICIAL

महाराष्ट्र MAHARASHTRA ● 2018 ● AK 666264

GOVT. TREASURY OFFICE
जिल्हा कोषागार कार्यालय, ठाणे
24 OCT 2018
मुख्य लिपीक / लिपीक

मिरा भाईंदर महानगरपालिका
कर कार्यालय भाईंदर (प.)

३) वाहनतळाची देखभाल करणे आणि पैसे भरा वाहन उभे करा योजना (पे ॲन्ड पार्क) चालविणे याकरीता लागणारा कर्मचारी वर्गाची नेमणुक व कर्मचाऱ्याचा खर्च ठेकेदार यांनी करावयाचा आहे. तसेच आवश्यक चौक्या, चालू स्थितीत असलेले घडयाळ आणि पैसे भरा वाहन उभे करा योजनेसाठी आवश्यक त्या इतर सुविधा यासाठी लागणारा सर्व खर्च एजंट / ठेकेदार करण्यास तयार आहे.

४) एजंट / ठेकेदार त्यांचे देखरेखीखाली गाडी उभी करण्याचे कामावर लक्ष देता यावे म्हणून नीटनेटका गणवेशधारी कर्मचारी वर्गाची नेमणुक करतील असे मान्य करतात.

५) वाहनतळावर ठेकेदार यांनी नेमणुक केलेल्या कर्मचारी यांनी वाहनतळात असलेल्या वाहनांस कोणतेही नुकसान किंवा हानी केल्यास त्यास महापालिका जबाबदार राहणार नाही, त्यास ठेकेदार जबाबदार राहील.

For SHRUTI ENTERPRISES

Proprietor

भारतीय गैर न्यायिक
भारत INDIA
रु. 500
FIVE HUNDRED RUPEES
पाँच सौ रुपये
सत्यमेव जयते
Rs. 500
INDIA NON JUDICIAL

महाराष्ट्र MAHARASHTRA ◑ 2018 ◑ AK 666265

जिल्हा कोषागार कार्यालय, ठाणे
24 OCT 2018
दुय्यम प्रमुखलिपीक / लिपीक

६) मानवी आरोग्यास व जिवितास धोकादायक असणा-या आजारांची, संसर्गजन्य आजाराची किंवा लागण झालेल्या कोणत्याही व्यक्तीस कर्मचारी म्हणून कामावर ठेवणार नाहीत असे ठेकेदारास मान्य आहे.

७) एजंट / ठेकेदार मान्य करतात की, प्रत्येक वेळी बालकामगार अधिनियमाच्या तरतुदींचे किमान वेतन कायदा व इतर साधर्म्य असणा-या अधिनियंमांचे, फेर अधिनियमांचे व त्यांच्या बदलांचे नियमित पालन करतील आणि सदर अधिनियमांच्या तरतुदींचे उल्लघंन करुन अशा कोणत्याही व्यक्तीस कामावर नेमुन गाडयांवर वाहनतळाचे जागी काम करण्यास परवानगी देणार नाहीत व तसेच गुन्हेगारी यादीत नोंद असलेल्या कोणत्याही व्यक्तीस ठेकेदार वाहनतळावर कर्मचारी म्हणून नेमणुक करणार नाहीत.

For SHRUTI ENTERPRISES
Proprietor

भारतीय गैर न्यायिक

भारत INDIA

रु. 500 FIVE HUNDRED RUPEES

पाँच सौ रुपये Rs. 500

सत्यमेव जयते

INDIA NON JUDICIAL

महाराष्ट्र MAHARASHTRA ◑ 2018 ◑ AK 666266

TREASURY OFFICE

जिल्हा कोषागर कार्यालय, ठाणे

24 OCT 2018

मुद्रांक प्रमुख लिपीक / लिपीक

मिरा भाईंदर महानगरपालिका

८) या कराराचे मुदतीत सदर एजंट वाहनतळाच्या जागेची देखभाल व दुरुस्ती महापालिकेच्या समाधानार्थ करण्याची जबाबदारी एजंट/ठेकेदार स्विकारीत असून सदर देखभाल व दुरुस्ती करीताचे होणारे सर्व खर्च सदर एजंट/ठेकेदार हेच करतील. जागेचा ताबा घेणेपुर्वी माहिती व सुचनेचे पालन करणेकरीता जागेत नेहमी उपलब्ध असणा-या जबाबदार व्यक्तीचे/व्यवस्थापकांचे नाव मनपास कळविण्याची जबाबदारी एजंट /ठेकेदार यांची राहील. महानगरपालिकेच्या भेट देणा-या अधिका-यांकडून माहिती घेणेसाठी "पैसे भरा आणि वाहन उभे करा" जागेत नोंदवही ठेवण्यास एजंट/ठेकेदार यांच्यावर बंधनकारक आहे.

For SHRUTI ENTERPRISES

Proprietor

भारतीय गैर न्यायिक

भारत INDIA

रु. 500 FIVE HUNDRED RUPEES

पाँच सौ रुपये Rs. 500

INDIA NON JUDICIAL

महाराष्ट्र MAHARASHTRA ● 2018 ● AK 666267

D) अपघात व हानी :

१) एजंट /ठेकेदार मान्य करतो की, सदर वाहन तळाची देखभाल डागडुगी करताना काही भागाची मोडतोड, नुकसान झाल्यास किंवा कोणतीही व्यक्ती किंवा त्रयस्तापैकी कोणतीही माणसे जखमी झाल्यास त्याला महापालिका जबाबदार असणार नाही.

२) एजंट/ठेकेदार असे मान्य करतात की, महापालिकेकडून नोटिस मिळाल्यावर ते सदर नोटिस मिळाल्यापासून तीन दिवसांत सदर वाहन तळावर पे ॲन्ड पार्क च्या कामाबाबत झालेल्या दोषांची/कसुरांची दुरुस्ती महानगरपालिकेच्या समाधानार्थ स्वत:चे खर्चाने करतील आणि तसे न केल्यास महानगरपालिका ही कोणतीही पुढील नोटिस किंवा सुचना न देता सदर एजंट/ठेकेदार यांचेच खर्चाने आणि जबाबदारीवर सदर आवश्यक असलेले काम करणेंस मुक्त राहील.

जिल्हा कोषागर कार्यालय, ठाणे
24 OCT 2018
मुद्रांक प्रमुख लिपीक / लिपीक

For SHRUTI ENTERPRISES
Proprietor

भारतीय गैर न्यायिक

भारत INDIA

रु. 500 FIVE HUNDRED RUPEES

पाँच सौ रुपये Rs. 500

सत्यमेव जयते

INDIA NON JUDICIAL

महाराष्ट्र MAHARASHTRA ◑ 2018 ◑ AK 666268

जिल्हा कोषागर कार्यालय, ठाणे
24 OCT 2018
मुद्रांक प्रमुख लिपीक / लिपीक

३) मिरा भाईदर महानगरपालिका, महापालिकेचे अधिकारी आणि कर्मचारी यांना कोणत्याही हानी, नुकसान, तोटा यांपासून मुक्त ठेवून नुकसान, तोटा, मोडतोड, खर्च, शुल्क, मागणी, हक्क जे असेल ते, तसेच कामगार भरपाई नियम १९२४ नुसार अधिकारी किंवा कर्मचारी भरपाईस पात्र असलेल्या नोकरांना, एखाद्या व्यक्तीला दुखापत अथवा महापालिकेच्या संपत्तीला प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्ष झालेली नुकसान भरपाई, अपघात अथवा अन्य कोणत्याही कारणाने झालेली मोडतोड किंवा जिवीत हानी याची भरपाई देण्याचे एजंट/ठेकेदार मान्य करीत आहे.

E) **संबंधित प्राधिकरणांची परवानगी :**

सदर एजंट/ठेकेदार हे सदर वाहनतळात पे ॲन्ड पार्क तत्वावर चालविण्यासाठी संबंधित सक्षम प्राधिकारणांची परवानगी/ परवानग्या मिळवतील. सदर परवानग्या मिळविणे करीताचे

For SHRUTI ENTERPRISES
Proprietor

भारतीय गैर न्यायिक

भारत INDIA

रु. 500 FIVE HUNDRED RUPEES

पाँच सौ रुपये Rs. 500

सत्यमेव जयते

INDIA NON JUDICIAL

महाराष्ट्र MAHARASHTRA ◑ 2018 ◑ AK 666269

होणारे खर्च आणि त्याचे शुल्क सदर एजंट/ठेकेदार हेच अदा करतील.

F) कराराचे तसेच नियम आणि विनियमांचे अनुपालन करणे :

१) सदर एजंट/ठेकेदार यांनी या करारानुसार कोणतीही बाब करणेस नकार दिला किंवा हयगय केल्यास अशावेळी महानगरपालिका सदरचे काम करणेसाठी एजंट/ठेकेदारांना नोटिस देईल आणि तरीही सदर एजंट/ठेकेदार यांनी तशी कामे करणेची हयगय केली किंवा नकार दिल्यास अशावेळी सदर एजंट/ठेकेदार यांचेद्वारे पुढे करण्यांत आलेली हयगय किंवा नकारासंबंधात करावयाच्या कारवाई बाबतचे तिचे कोणत्याही अन्य अधिकारांना कोणतीही बाधा न करता सदर एजंट/ठेकेदार

जिल्हा कोषागर कार्यालय ठाणे 24 OCT 2018 मुख्य प्रमुख लिपीक / लिपीक

For SHRUTI ENTERPRISES
Proprietor

भारतीय गैर न्यायिक

भारत INDIA

रु. 500

FIVE HUNDRED RUPEES

पाँच सौ रुपये

सत्यमेव जयते

Rs. 500

INDIA NON JUDICIAL

महाराष्ट्र MAHARASHTRA ◑ 2018 ◑ AK 666270

जिल्हा कोषागर कार्यालय, ठाणे
24 OCT 2018
मुख्य प्रमुख लिपीक / लिपीक

यांचेकडून त्या संबंधातील खर्च वसूल करणेंस मनपास अधिकार राहील.

२) महानगरपालिकेने निश्चित केलेल्या जागेवर (निविदा पुस्तिकेतील 'जोडपत्र-'अ') पे ॲन्ड पार्क चालविण्यासाठी अडथळा निर्माण झाला किंवा मिरा भाईदर महानगरपालिका क्षेत्रात भविष्यात विकास कामामध्ये सदर कामाचा अड्थळा निर्माण होत असल्यास, सदरच्या जागेतील पे ॲन्ड पार्क ची योजना रद्द किंवा स्थलांतर करणे हा अधिकार महापालिकेने राखून ठेवला आहे. तो निर्णय अंतिम राहील व तो निर्णय एजंट/ठेकेदार यांस बंधनकारक असेल.

३) एजंट/ठेकेदार मान्य करतात की, भविष्यांत महानगरपालिका, राज्य सरकार, केंद्र सरकारद्धारे करण्यांत येणारे सुधार, बदल किंवा फेरफारांचे अनुपालन करण्याची जबाबदारी स्विकारीत आहेत.

For SHRUTI ENTERPRISES

Proprietor

भारतीय गैर न्यायिक

भारत INDIA

रु. 500 FIVE HUNDRED RUPEES

पाँच सौ रुपये Rs. 500

INDIA NON JUDICIAL

महाराष्ट्र MAHARASHTRA ◑ 2018 ◑ AK 666271

जिल्हा कोषागार कार्यालय, ठाणे 24 OCT 2018 अनुज्ञ लिपीक / लिपीक

मिरा भाईंदर महानगरपालिका कर कार्यालय भाईंदर (प.)

४) एजंट/ठेकेदार मान्य करतात की, कंत्राटाच्या कालावधीत दर महिन्यांच्या महसूल रकमेवर चालू दराने वस्तु व सेवा कर मुदतीत भरण्याची जबाबदारी ठेकेदार यांची राहिल. सदर वस्तु व सेवा कराची रक्कम दर महिन्याला महानगरपालिका फंडात जमा करणे बंधनकारक आहे. त्याचप्रमाणे वेळोवेळी लागू झालेल्या वस्तु व सेवा कराच्या दराप्रमाणे सदर कराचा भरणा करणे ठेकेदार यांच्यावर बंधनकारक राहिल. वस्तु व सेवा कराचा मुदतीत भरणा न केल्यास, विलंब केल्यामुळे लागणारा व्याज व दंड ठेकेदार यांच्याकडून वसुल करण्यात येईल आणि त्यासाठी ठेकेदार यांनी महापालिकेकडे जमा केलेली Security Deposit जप्त करणेची कार्यवाही करणेत येईल.

५) मिरा भाईंदर महानगरपालिकेने वेळोवेळी दिलेल्या सुचनांचे पालन करणे एजंट /ठेकेदारास बंधनकारक असेल व ठेकेदार ते मान्य करतात.

For SHRUTI ENTERPRISES

Proprietor

भारतीय गैर न्यायिक

भारत INDIA

रु. 500 FIVE HUNDRED RUPEES

पाँच सौ रुपये Rs. 500

सत्यमेव जयते

INDIA NON JUDICIAL

महाराष्ट्र MAHARASHTRA ◑ 2018 ◑ AK 666272

६) महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या मधील कायदयांचे पालन व मनपाचे धोरण पालन करण्याची जबाबदारी एजंट/ठेकेदार याची राहील.

**G) सर्व दावे, कारवाई नुकसानाबाबत एजंट/ठेकेदार यांची जबाबदारी :**

१) या कराराद्वारे प्रदान करण्यांत आलेल्या वाहन पे ॲन्ड पार्कच्या अधिकारांची अंमलबजावणी करतांना निर्माण होणारे सर्व दावे, कारवाई, मागण्या, नुकसान, याबद्दल सर्वस्वी जबाबदारी एजंट/ठेकेदाराची राहील.

२) पे ॲन्ड पार्कच्या कामासंदर्भात कोणत्याही व्यक्तींना किंवा महानगरपालिकेच्या मालमत्तेस किंवा अन्य व्यक्तींना कोणतीही हानी, नुकसान, दुखापत/इजा किंवा जिवित हानी झाल्यास त्याकरीता सदर एजंट/ठेकेदार हे एकटेच जबाबदार राहतील आणि अशा प्रकारचे प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष झालेल्या जिवित

For SHRUTI ENTERPRISES

Proprietor

भारतीय गैर न्यायिक

भारत INDIA

रु. 500 FIVE HUNDRED RUPEES

पाँच सौ रुपये Rs. 500

INDIA NON JUDICIAL

महाराष्ट्र MAHARASHTRA ◑ 2018 ◑ AK 666273

किंवा मालमत्तेच्या हानीपासून सदर एजंट/ठेकेदार हे महानगरपालिकस पुर्णतः दोषमुक्त ठेवतील.

३) या कराराचे मुदतीत कोणत्याही वेळी संप, टाळेबंदी, साहित्याचा तुटवडा, युध्द, आग, पुर किंवा कोणतीही सरकारी अधिनियमिती किंवा विनिमय किंवा महानगरपालिकेच्या नियंत्रणाबाहेरील अशा कोणत्याही इतर कारणास्तव या करारात नमुद केलेल्या अटी आणि शर्तीनुसार कराराची पुर्तता करणे अशक्य झाल्यास सदर एजंट/ठेकेदार यांना कराराची पुर्तता करणेंस झालेली असमर्थता या संबंधात महानगरपालिकेकडे कोणताही दावा करणेचा अधिकार राहणार नाही व त्याबद्दलचे नुकसान मनपाकडे मागता येणार नाही.

For SHRUTI ENTERPRISES

Proprietor

भारतीय गैर न्यायिक
भारत INDIA
रु. 500 FIVE HUNDRED RUPEES
पाँच सौ रुपये Rs. 500
सत्यमेव जयते
INDIA NON JUDICIAL
महाराष्ट्र MAHARASHTRA ◑ 2018 ◑ AK 666274

कोषागर कार्यालय, ठाणे
24 OCT 2018
प्रमुख लिपीक / लिपीक

**H) अधिदानाच्या / महसूलाच्या (Payment) अटी व अनुसूची :-**

१) ठेकेदार हे मान्य करीत आहेत की, करारनामा झालेल्या तारखेपासून तीस दिवसानंतर येणा-या महिन्याच्या सात दिवसांच्या आत ठेकेदार यांनी प्रथम महसूल रक्कमेचा हप्ता रुपये ११,८७,५००/- एवढी मनपामध्ये भरणा करावी. तद्नंतर उदा. माहे मे या महिन्याचा होणारा मासिक महसूल माहे जून १ ते ७ तारखेपर्यंत महापालिकेत भरणा करावा. (सुट्टीचे दिवस वगळून) तसेच ठेकेदार हे मान्य करतात की, माहे मार्च महिन्यांची महसूल रक्कम त्याच महिन्यांच्या १५ तारखेपर्यंत महानगरपालिकेमध्ये भरतील. ठेकेदार यांनी वरील नमुद मासिक हप्ताच्या रक्कमेचे व वस्तु व सेवा कराच्या रक्कमेचे २४ धनादेश 'मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या' नावे आगाऊ स्वरुपात महानगरपालिकेकडे कार्यादेश मिळाल्यापासुन सात

For SHRUTI ENTERPRISES

भारतीय गैर न्यायिक

भारत INDIA

रु. 500 FIVE HUNDRED RUPEES

पाँच सौ रुपये Rs. 500

सत्यमेव जयते

INDIA NON JUDICIAL

महाराष्ट्र MAHARASHTRA ◑ 2018 ◑ AK 666275

कोषागार कार्यालय, ठाणे
24 OCT 2018
लिपीक / लिपीक

दिवसांत सादर करावेत. वस्तु व सेवा करासाठी महानगरपालिकेच्या नावे स्वतंत्र धनादेश (एकूण १२) ठेकेदार यांनी सादर करावेत

करारनाम्याच्या अटीशर्तीनुसार व मा. स्थायी समिती सभेने दिलेल्या मंजुरी प्रमाणे पे ॲन्ड पार्क योजनेमधून प्राप्त होणारी मासिक महसूल रक्कमेप्रमाणे एजंट/ठेकेदार हे खालील दर्शविलेल्या वार्षिक रक्कमेनुसार मनपामध्ये भरणा करतील.

३) सर्व अधिदाने/महसूल रक्कम (Payment) ही रोख किंवा मिरा भाईदर महानगरपालिकेच्या नावाने कोणत्याही शेडयुल/राष्ट्रीयकृत बॅकेवर काढलेल्या **'अकाऊंट पेयी ओन्ली'** धनादेशाद्वारे देण्यात यावी.)

मिरा भाईंदर महानगरपालिका
कर कार्यालय भाईंदर (प.)

४) सदर कराराचे मुदतीत सदर एजंट/ठेकेदार हे महानगरपालिकेच्या कोणत्याही कामापासून किंवा कोणत्याही अदृश्य कारणांपासून किंवा अन्य आधारांवर काम करण्यास

For SHRUTI ENTERPRISES

Proprietor

भारतीय गैर न्यायिक

भारत INDIA

रु. 500 FIVE HUNDRED RUPEES

पाँच सौ रुपये Rs. 500

सत्यमेव जयते

INDIA NON JUDICIAL

महाराष्ट्र MAHARASHTRA ◑ 2018 ◑ AK 666276

अडथळा निर्माण होण्याच्या कोणत्याही कारणांस्तव असल्यास, कोणताही दावा महानगरपालिकेकडे करणेस अधिकार राहणार नाहीत.

मुद्दा क्र.१ मध्ये नमुद केल्याप्रमाणे एजंट/ठेकेदार यांनी महसूल रक्कम देण्यास कसुर केल्यास, सदर महानगरपालिकेकडे अन्य कायदेशीर उपाययोजना खुल्या असल्यातरी सदर एजंट/ठेकेदार हयांनी सदर भाडे रक्कम देय झाल्याच्या दिनांकापासून ते सदर रक्कम महानगरपालिकेस ज्यादिवशी मिळाली त्या दिवसापर्यत (दोन्ही दिवस मिळून) दरसाल १८ टक्के दराने व्याज दयावे लागेल आणि अशी रक्कम एक महिन्यापेक्षा जास्त काळ स्वत:कडे ठेवल्यास किंवा अदा न केल्यास तसेच दरसुची पेक्षा जास्त पैसे वसुल केल्यासमहानगरपालिकेस सदर करारनामा रद्द करणेचा अधिकार राहील आणि अशावेळी सदर एजंट/ठेकेदार यांनी जमा केलेली प्रतिभूती ठेव (सिक्युरीटी डिपॉझिट) किंवा

For SHRUTI ENTERPRISES

Proprietor

मिरा भाईंदर महानगरपालिका कर कार्यालय भाईंदर (प.)

इसारा रक्कम किंवा दोन्हीही जप्त करणेंचा अधिकार महापालिकेस राहील व काळ्या यादीत टाकून गुन्हा दाखल करण्यात येईल.

६) जर सदर एजंट/ठेकेदार हे ठेक्याचे काम सुरु करु शकले नाहीत, आणि पहिल्या हप्त्याची रक्कम ठेका सुरु होण्यापुर्वी देण्यात कसुर केल्यास, महानगरपालिकेस सदर करार रद्द करण्याचा अधिकार राहील.

**I) एजंट/ची दिवाळखोरी किंवा एजंट/द्वारे कराराच्या अटींचे पालन न करणे :-**

जर सदर एजंट/ठेकेदार यांनी दिवाळखोरीची कोणतीही कृती केली किंवा दिवाळखोर घोषित झाल्यास किंवा त्यांचे विरुध्द विघटनाची कारवाई केली गेली किंवा स्वत: किंवा न्यायालयाचे निर्देशांना अधीन राहून केलेल विघटन किंवा एजंट/ठेकेदार यांना या करारा अंतर्गतचे देय रकमेबाबत जप्ती कारवाहींचा सामना करावा लागल्यास किंवा महानगरपालिकेस देय असणाऱ्या रकमांचा भार सदर करारावर किंवा ठेक्यावर आल्यास किंवा त्यांचे क्रेडीटर्स बरोबर समेट केल्यास किंवा सदर एजंट/ठेकेदार यांनी या करारातील किंवा त्याच्या कोणत्याही भागातील अटी आणि नियमांचे पालन करणेत कसुर केली तर अशावेळी महानगरपालिका ही सदर एजंट/ठेकेदार यांचेद्धारे झालेले उल्लघंन किंवा कसुर, याकरीता देय हप्ता किंवा मोबदला रुपाने किंवा नुकसान म्हणून सर्व रकमा वसूल करणेंच्या तिच्या अधिकारांना कोणतीही बाधा न करता सदर करारनामा रद्द करणेस अधिकार राहील.

**J) प्रतिभूती ठेव (सिक्युरीटी डिपॉझिट)**

महापालिकासोबत झालेल्या सदर कराराच्या तारखेपासून ७ दिवसांत ठेकेदार (बिडर्स) हे महापालिकेकडे प्रतिभूती ठेव रक्कम (सिक्युरीटी डिपॉझिट) अदा करतील. सदर प्रतिभूती ठेव रक्कम ही एजंट/ठेकेदार यांनी बिड बी फॉर्ममध्ये दर्शविलेला वार्षिक महसूल रक्कमेच्या ५० टक्के म्हणजेच रु. ७१,२५,०००/- (अक्षरी एकाहत्तर लाख पंचवीस हजार रुपये) इतकी असेल. सदर सिक्युरिटी डिपॉझिटसाठी होणारी रक्कम बँक गॅरेंटी स्वरुपात भरणा करण्यांत यावा. सदर प्रतिभूती ठेव रक्कम (सिक्युरीटी डिपॉझिट) कोणत्याही राष्ट्रीयकृत/शेडयुल्ड बँकेच्या

For SHRUTI ENTERPRISES
Proprietor

बॅंक गॅरटी स्वरुपात महापालिका यांचे नावांने देतील. सदर प्रतिभूती ठेव (सिक्युरीटी डिपॉझिट) ही सदर कराराच्या अटींची पुर्तता होणेपर्यंत मुदतीकरीता वैध असेल.

**K) प्रतिभूती ठेव (सिक्युरीटी डिपॉझिट) परत करणे :-**

प्रतिभूती ठेव (सिक्युरीटी डिपॉझिट) रक्कमेवर व्याज दिले जाणार नाही. सदर कराराच्या अटीची पूर्णपणे पूर्तता झाल्यानंतर तसेच महापालिकेची कोणतीही देय रक्कम शिल्लक नसल्यास किंवा त्यावर कोणताही दावा नसल्यास मागणी केल्यानंतरच सदर डिपॉझिटचा परतावा करण्यात येईल.

**L) प्रतिभूती ठेव रक्कम (सिक्युरीटी डिपॉझिट) जप्त करणे :-**

संपुर्ण प्रतिभूती ठेव रक्कम (सिक्युरीटी डिपॉझिट) किंवा तिचा कोणताही भाग हा सदर एजंट/ठेकेदार यांनी सदर कराराच्या अटी आणि शर्तीचे पालन करणे कसूर केल्यास किंवा त्याच्या आवश्यकताची पुर्तता /पालन न केल्यास सदर एजंट/ठेकेदार यांचे विरुध्द सदर महानगरपालिकेस असलेले दावे व अधिकार यांना कोणतीही बाधा न आणता ती प्रतिभूती ठेव (सिक्युरीटी डिपॉझिट) किंवा तिचा भाग हा जप्त होणेस पात्र असेल.

**M) एजंटच्या सर्व जबाबदारीचे धोरण (सी.ए.आर.) :-**

सदर एजंट/ठेकेदार हे पे ॲन्ड पार्क या योजनेअंतर्गत करण्या संबंधातील कामांपासून महापालिका यांचे मिळकतीस कोणतीही हानी, नुकसान होणे किवा व्यत्यय निर्माण होणे किंवा सदर कामाकरीता कर्तव्यावर असलेल्या किंवा त्यांनी नियुक्त केलेले कामगार यांना कोणतीही हानी दुखापत नुकसान होणे तसेच वर्कमेन कॉम्पकन्सेशन ॲक्ट अंतर्गत केलेले किंवा करण्यात येतील असे सर्व दावे, कारवाईची मागणी यापासून महापालिका यांना सर्वत्तोपरी दोषमुक्त ठेवण्याची याद्वारे हमी देत आहेत आणि अशाप्रकारे सदर ठेकेदार यांचे मालकीच्या साहित्यास सदर कारणांपासून कोणतीही हानी किंवा नुकसान झाल्यास त्याची कोणतीही जबाबदारी महापालिका स्विकारणार नाही.

For SHRUTI ENTERPRISES

Proprietor

**N) क्षतिपूर्ती (इन्डेमनीटी) :-**

१) सदर एजंट/ठेकेदार हे पे ॲन्ड पार्क करण्याच्या कामांपासून महापालिका यांचे कोणत्याही मालमत्तेस हानी किंवा नुकसान होणे किंवा वर्कमेन कॉम्पेन्सेशन ॲक्ट अंतर्गत केलेले किंवा करण्यात येतील असे सर्व दावे, कारवाई मागणी यापासून किंवा कोणाही अन्य व्यक्तींचा मृत्यू अंपगत्व किंवा दुखापत यापासून निर्माण होणारे दावे यापासून महापालिकेला सर्वत्तोपरी दोषमुक्त ठेवण्याची हमी देत आहोत. आणि सदर संबंधातील सर्व खर्च, आकार किंवा दाव्याचे योग्य प्रकारे मुल्यमापन करुन सदर एजंट/ठेकेदार हे महापालिकेने मागणी केल्यावर त्याची तात्काळ भरपाई करुन देतील.

२) एजंट/ठेकेदार यांचेद्धारे झालेल्या कायदयाच्या उल्लघंनापासून महापालिका यांना दोषमुक्त ठेवणे. एजंट/ठेकेदार यांचेकडून सदर कराराच्या किंवा ठेक्याच्या मुदतीत कायद्याच्या विरुध्द असतील अशा पे ॲन्ड पार्कच्या कामासंबंधात राज्य किंवा केंद्रसरकार किंवा स्थानिक प्राधिकरणे यांच्या कोणत्याही कायद्याचे किंवा नियम वगैरेचे उल्लघंन झाल्यामुळे आकारण्यात किंवा लादण्यात येणारे दंड, शिक्षा, आणि इतर खर्च वगैरे पासून महापालिका यांना सर्वतोपरी दोषमुक्त ठेवण्याची हमी देत आहेत.

३) सदर एजंट/ठेकेदार हे सर्व कॉन्ट्रॅक्ट लेबर (रेग्युलेशन ॲन्ड ऑपरेशन) कायदा व नियम तसेच मिनिमम वेजेस ॲक्ट, बाल मजुर कायदा, इतर लेबर लॉ यासहित सर्व संविधी/पारिनियमांचे पालन करतील आणि सदर कायद्यापासून निर्माण होणारे सर्व दावे, कारवाई यापासून महापालिका यांना सर्वतोपरी दोषमुक्त ठेवतील.

**O) एजंट यांना महानगरपालिकेचे सहाय्य :-**

महानगरपालिका सदर ठेकेदार/एजंट यांचेबरोबर अशी प्रसंविदा करते की, सदर एजंट/ठेकेदार यांनी या करारातील सर्व अटी आणि शर्तीचे पालन केले आणि सर्व देय रकमा अदा केल्यावर त्यांना कोणत्याही अडथळा किंवा व्यत्ययविना पे ॲन्ड पार्कचे काम करणेस अधिकार राहील. परंतु अट क्र.१.७ - अ चे पालन करुन आणि जेथे आवश्यकता असेल त्या ठिकाणी सदर महानगरपालिका एजंट/ठेकेदार

For SHRUTI ENTERPRISES

Proprietor

यांचे खर्चाने सदर एजंट/ठेकेदार यांचे अधिकारांना अडथळा किंवा व्यत्यय निर्माण करणारे किंवा हस्तक्षेप करणारे व्यक्तीविरुध्द योग्य कारवाई करणेंस सहकार्य करील.

**P) ठेका रद्द करण्याची नोटिस :-**

१) सदर करार/ठेक्याच्या मुदतीत सदर एजंट/ठेकेदार यांचे व्यवस्थापन किंवा प्रतिनिधी यांचे बाबत महानगरपालिका असमाधानी होईल असे कोणतेही कारण घडल्यास अशावेळी सदर महानगरपालिका ही एजंट/ठेकेदार यांना लेखी नोटिस देवून सदर नोटिसमध्ये नमुद केलेल्या असमाधानाबाबतच्या त्रुटीचे खुलासा करणेंस सांगेल. सदर एजंट/ठेकेदार हे नोटिस प्राप्त झाल्यापासून १५ दिवसांच्या काळात अशा असमाधानाबाबतच्या कारणांची दुरुस्ती महानगरपालिकेच्या समाधानार्थ दूर करु शकले नाहीत. तर अशावेळी याउलट सदर करारात काहीही नमुद केले असले तरी महानगरपालिकेस एजंट/ठेकेदार यांना १५ दिवसांची पुर्व नोटिस देऊन सदर करारनामा रद्द करण्याचा महापालिकेला अधिकार राहतील.

२) पहिला महसुलाचा हप्ता देण्यास कसूर केल्यास किंवा सदर एजंट/ठेकेदार यांनी माघार घेतली किंवा ठेका सुरु केला नाही. अशावेळी एजंट/ठेकेदार यांना ७ दिवसांची पुर्व लेखी सुचना देवून ठेका रद्द करणेचा अधिकार असेल आणि सदर सुचनेचा काळ संपल्यावर सदर करारनामा रद्द होईल. आणि सदर एजंट/ठेकेदार यांची ई.एम.डी. किंवा प्रतिभूती ठेव रक्कम किंवा दोन्हीही जप्त केल्या जातील.

३) सदर एजंट/ठेकेदार यांनी करारातील कोणत्याही अटीचे उल्लघंन केले किंवा महापालिका यांना देय असलेली रक्कम देणेस कसुरवार ठरल्याने, कायद्याने तो त्याची कर्ज चुकती करु शकत नाही असे मानले गेल्यास म्हणजेच दिवाळखोर घोषित केल्यास किंवा सदर कंपनीचे व्यवहारांचे समायोजनाबाबत ठराव मंजुर किंवा पास करण्यात आल्यास अशावेळी महापालिका ही सदर एजंट/ठेकेदार यांना नोटिस देवून सदर एजंट/ठेकेदार यांना या कराराअंतर्गतच्या कोणत्याही जबाबदारी किंवा दायित्वापासून मुक्त न करता किंवा महापालिका यांना दिलेले अधिकार आणि प्राधिकारंना कोणतीही बाधा न करता सदर करार रद्द करतील आणि सदर ठेक्याचे काम पुर्ण करणे करीता अन्य एजंट/ठेकेदार यांना नियुक्त करतील.

For SHRUTI ENTERPRISES

Proprietor

४) एजंट/ठेकेदाराने पे ॲन्ड पार्कची सुविधी पुरविण्याबाबतचा कालावधी या कराराच्या कालावधी पुरतेच करावे.

५) सदर करारनामा रद्द झालेवर महापालिका ही तिचे प्रमाणकानुसार सदर एजंट/ठेकेदार यांचेकडून भरपाई म्हणून वसूल करावयाच्या रकमेचे मुल्यांकन करील, अशी रक्कम महापालिका ही सदर यशस्वी निविदाधारक यांचे प्रतिभूती ठेव रकमेतून किंवा या कराराअंतर्गत यशस्वी बिडर्स यांनी भरणा केलेल्या अन्य कोणत्याही रक्कमेतून किंवा महापालिका यांचे बरोबर केलेला इतर करार किंवा ठेका व सामानाच्या जप्ती याद्वारे किंवा इतर मार्गाने वसूल करील.

**R) ठेका पूर्णतः किंवा अंशतः मुदतीपुर्व रद्द करणे :-**

१) कोणत्याही वेळी महानगरपालिकेने जर सर्व किंवा कोणत्याही पे ॲन्ड पार्कची जागा (निविदेत विनिर्दिष्ट केल्यानूसार) कोणत्याही कारणांस्तव मागे घेणेचे ठरविल्यास आणि अशा कोणत्याही किंवा सर्व जागा मनपास आवश्यक असल्यास अशावेळी महानगरपालिका एक महिना पूर्व सूचना देवून सदर करार मुदतीपूर्वी रद्द करील. अशाप्रकारे मुदतपुर्व करार रद्द करतेवेळी सदर एजंट/ठेकेदार यांना सदर करार अकस्मात रद्द केल्याच्या कारणांस्तव कोणत्याही भरपाईचा दावा करणेस अधिकार राहणार नाहीत व करार खंडीत करणेंच्या तारखेपर्यत वापरण्यात आलेल्या पे ॲन्ड पार्कचा हप्ता महानगरपालिकेस अदा करील. सदर ठेक्याचा कालावधी संपुष्टात आल्यास किंवा सदरचा करारनामा रद्द झाल्यास (मुदतपूर्वी) ठेकेदार महापालिकेस पे ॲन्ड पार्कच्या जागेचा ताबा (Peaceful and vacant possession) परत करील. सदर ठेका समाप्तीनंतर ठेकेदार यांनी सदर जागेचा ताबा देण्यास कसूर केल्यास, सदर जागेतून महापालिका ठेकेदारा अतिक्रमण (Encroach) समजून काढून टाकील आणि सदर कारवाई करीत असताना ठेकेदाराच्या कोणत्याही मालमत्तेस हानी झाल्यास त्यास महापालिका जबाबदार राहणार नाही.

२) एजंट / ठेकेदार असे मान्य करतो की, जर सदर जागा महापालिकेला वापरात द्यावी लागली किंवा महापालिकेच्या काही कारणास्तव बंद करावी लागली तर महापालिकेस मुदती आधी करार संपविण्याची मुभा राहील. त्यावेळी एजंट / ठेकेदार सर्व जागा खाली करुन देईल. व त्यासाठी कोणतीही मोडतोड भरपाई किंवा नुकसान शुल्क

For SHRUTI ENTERPRISES
Proprietor

मागणी आणि पर्यायी जागेची मागणी करु शकणार नाही. तथापि वाहन तळ ज्यादिवशी बंद होईल तोपर्यंतचे होणारे महसूल भरावे लागेल. त्यापुढील कालावधीचा महसूल न भरण्याचे अधिकार एजंटला /ठेकेदारास राहतील.

३) कराराची मुदत संपताच किंवा मुदतपुर्व करार संपविल्यास वाहन तळाची जागा एजंट/ ठेकेदार शांतपणे रिकामी करुन त्वरीत मनपास जागेचा ताबा हस्तांतरीत करण्याचे मान्य करीत आहेत.

**S) वादाचा निवाडा :-**

एम.बी.एम.सी आणि एजंट/ठेकेदार यांचेमध्ये या करारा संबंधातील कोणत्याही प्रकरणावरुन कोणताही वाद निर्माण झाला किंवा सदर कराराच्या मुदतीमध्ये किंवा करार पुर्ण झाल्यावर कोणताही वाद निर्माण झाल्यास तो वाद समाधानाकरीता मा.न्यायालय, ठाणे येथे दाद मागता येईल.

**T) सामान्य अट (General Condition) :-**

१) ठेकेदार मान्य करतो की, मनपाने वाहनतळाच्या जागेत एखाद्या व्यक्तीला किंवा कंपनीला मोबाईल ॲडव्हटायजिंग व्हॅन ही उभी करुन जाहिरात करण्याकरीता परवानगी दिल्यास ठेकेदार सदर वाहनांवरील फक्त मनपाने मंजुर केलेल्या पे ॲन्ड पार्कसाठी ठरविण्यात आलेल्या दरपत्रकानुसार शुल्क आकारेल. तसेच ठेकेदार यांना सदर वाहन मालकांकडून जाहिरातीचा कोणताही मोबदला वसूल करण्याचा अधिकार राहणार नाही.

२) ठेकेदार मान्य करतो की,मुंबई मंद्राक अधिनियम अन्वये सदर करारनाम्यावर होणारी स्टॅम्प डयुटी भरण्याची तसेच सदरचा करारनामा नोंदणीकृत करुन घेण्याची जबाबदारी ठेकेदार यांची राहील.

महापालिका यांचेकडे निविदा फॉर्म सोबत सादर केलेले सर्व दस्ताऐवज व निविदा या कराराचा/ठेक्याचा एक भाग मानला जाईल. त्याचे तंतोतंत पालन करणे लायसेन्सी/ठेकेदार ची जबाबदारी राहील.

यांतील साक्षीत नमुद केलेले पक्षकार व साक्षीदार यांनी या करारात...... २०१८ या वर्षी समक्ष स्वाक्षरी केली आहे.

For SHRUTI ENTERPRISES

Proprietor

यांतील नमुद केलेले पहिले पक्षकार

**मिरा भाईदर महानगरपालिका**

यांचे करीता उप-आयुक्त

**मिरा भाईदर महानगरपालिका**

यांनी समक्ष सही केली आहे.

**उप- आयुक्त**

**मिरा भाईदर महानगरपालिका**

साक्षीदार :-

१. 

२. 

यांतील नमुद केलेले दुसरे पक्षकार

**मे.श्रुती इंटरपायजेस,**
**ए-१०३, मथुरा निकेतन,**
**कस्तुरी गार्डन जवळ,**
**टेंबा हॉस्पिटल, भाईंदर (प.)**

**मे.श्रुती इंटरपायजेस**

For SHRUTI ENTERPRISES

Proprietor

यांनी समक्ष स्वाक्षरी केली आहे. (एजंट / ठेकेदार)

साक्षीदार :-

१. Pradyumna M. Bhatt

२. Anil vi...